पुण्य नगरी

# 'डॉ. मगदूम फार्मसी'मध्ये फार्मासिस्ट दिन उत्साहात

**जयसिंगपूर :** जागतिक फार्मासिस्ट दिन दरवर्षी २५ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. तसेच १७ ते २३ सप्टेंबर दरम्यान राष्ट्रीय फार्माकोव्हिजिलन्स सप्ताह साजरा केला जातो, ज्याचा उद्देश जागतिक आरोग्य सेवा सुधारण्यात फार्मासिस्टच्या महत्त्वपूर्ण भूमिकेबद्दल जागरूकता निर्माण करणे व औषधांच्या सुरक्षित वापरासाठी जागरूकता वाढवणे आहे. डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेज, जयसिंगपूर आणि इंडियन फार्मास्युटिकल असोसिएशन कोल्हापूर लोकल ब्रँच यांच्यातर्फे जागतिक फार्मासिस्ट दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात सुमारे ५०० विद्यार्थी आणि नोंदणीकृत फार्मासिस्ट यांच्या सहभागाने काढण्यात आलेल्या फार्मासिस्ट रॅलीने झाली. फार्माकोव्हिजिलन्स सप्ताह निमित्ताने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उदगाव याठिकाणी प्रबोधनपर पथनाट्याचे सादरीकरण केले. तसेच महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय पातळीवर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मॉडेल मेकिंग, ओरल प्रेझेंटेशन, टेड टॉक, ॲड मॅड शो आणि रील मेकिंग यांचा समावेश होता. या स्पर्धेमध्ये बहुसंख्य फार्मसी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धांच्या बक्षीस वितरण समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. जे. जे. मगदूम होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुरेश नायर व कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शीतलकुमार पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली. सर्व विजेत्यांना बक्षीस रक्कम, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाला डॉ. जे. जे. मगदूम ट्रस्टचे चेअरमन डॉ. विजय मगदूम, व्हाईस चेअर पर्सन ॲड. डॉ. सोनाली मगदूम यांनी जागतिक फार्मसी दिनाच्या कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कॉलेजमधील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे नियोजन प्रा. स्नेहल पाटील आणि प्रा. अनुजा खिचडे यांनी केले.

Kolhapur Edition
Sep 27, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com